# कुलाबा–वांद्रे–सीप्झ मेट्रो–३ मार्ग

कफ परेड ते सीएसएमटी पर्यंत डाऊनलाईनचे काम पूर्ण

भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पूर्ण

मुंबई, २२ एप्रिल, २०२१ – ऐतिहासिक वारसा इमारती जवळील मेट्रो–३ च्या पॅकेज–१ चे ९६ टक्के भुयारीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) पूर्ण करण्यात आले. आज या पॅकेज अंतर्गत भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा डाऊन लाईन मार्गाचा ५६९ मी. भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४१८ रिंग्जच्या सहाय्याने १०६ दिवसात पूर्ण झाला. या भुयारीकरणासह पॅकेज–१ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाऊन लाईनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

सूर्या–२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल–मोड हार्ड–रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे .

ऐतिहासिक वारसा इमारती व समुद्रा नजीक भुयारीकरण करणे जिकिरीचे आहे. मात्र आमच्या अभियंत्यांच्या व कामगारांची उत्कृष्ट टीम हे शिवधनुष्य लीलया पेलत आहे. मला आनंद वाटतो की ऐतिहासिक वारसा इमारती जवळून भुयारीकरण करताना सर्व सुरक्षेविषयी दक्षता घेत पॅकेज –१ चे आतापर्यंत ९६% भुयारीकरण पूर्ण झाले." असे मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

पॅकेज–१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्च गेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत सहा भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले. पॅकेज–१ च्या भुयारीकरणाचा तपशील:

१) कफ परेड ते विधान भवन (अप लाईन १२२८ मी, डाऊन लाईन १२५४ मी)
२) विधान भवन ते चर्चगेट अप लाईन ४९८ मी, डाऊन लाईन ४८१ मी)
३) चर्चगेट ते हुतात्मा चौक (अप लाईन ६५४ मी)
४) हुतात्मा चौक ते सीएसएमटीअप लाईन (डाऊन लाईन ५६९मी)

मेट्रो–३ प्रकल्पासाठी एकूण आतापर्यंत एकूण ९५% भुयारीकरण पूर्ण झाले आहे.(समाप्त)


For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com